महाराष्ट्र शासन
# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसिअर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र.रासीक/विभा.सुसं.कार्य./३०४२ दिनांक: १९/१२/२०१९

## परिपत्रक

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत आयोजित विभागीय सुसंवाद कार्यक्रमाकरीता सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था/महाविद्यालयांचे प्रतिनिधींनी उपस्थित राहणेबाबत...**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अन्वये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाची स्थापना झाली. सदर अधिनियमातील नमुद तरतुदीनूसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेश परीक्षा आणि केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात.

सीईटी कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविताना महाविद्यालयांना प्रत्यक्षात उद्‌भवणाऱ्या तांत्रिक अडचणी/शंका, विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी तसेच संस्थांना सीईटी कक्षाकडून अपेक्षित असणाऱ्या सुधारणा समजून घेण्याकरीता विभागीय स्तरावर महाविद्यालयांशी सुसंवाद साधने आवश्यक वाटते, जेणेकरुन सीईटी कक्षाकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया आणखी सुलभ रित्या पार पाडता येईल. या कार्यक्रमात जास्तीत जास्त वेळ संस्थांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधण्यासाठी दिला आहे. प्रतिनिधींनी आपल्या अडचणी नमुद करणे व त्यावर उपाय सूचविणे या सूसंवादा दरम्यान अपेक्षित आहे.

| पुणे विभाग | | |
|---|---|---|
| जिल्ह्यांची नावे | १) पुणे, २) कोल्हापूर, ३) सातारा | ४) सोलापूर, ५) सांगली |
| दिनांक | प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
| | स. १०.३० ते दु. ०१.३० | दु. ०२.३० ते दु. ०५.३० |
| ०२ जानेवारी, २०२० (गुरुवार) | तंत्रशिक्षण विभाग पदवी अभ्यासक्रम | तंत्रशिक्षण विभाग पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | फक्त १ महाविद्यालयीन प्रतिनिधी | फक्त २ महाविद्यालयीन प्रतिनिधी |
| ०३ जानेवारी, २०२० (शुक्रवार) | उच्चशिक्षण विभाग पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम | कला/आयुष/वैद्यकीय/मत्स व दुग्ध आणि कृषी पदवी/ पदव्युत्तर विभाग |
| | फक्त २ महाविद्यालयीन प्रतिनिधी | फक्त २ महाविद्यालयीन प्रतिनिधी |
| **स्थळ - बी.जे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, (महात्मा गांधी सभागृह), जे.पी.नारायण रोड, ससून हॉस्पिटल कंपाऊंड, पुणे - ४११ ००१** | | |

| मुंबई विभाग | | |
|---|---|---|
| जिल्ह्यांची नावे | १) मुंबई, २) ठाणे, ३) रायगड | ४) रत्नागिरी, ५) सिंधुदुर्ग, ६) पालघर |
| दिनांक | प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
| | स. १०.३० ते दु. ०१.३० | दु. ०२.३० ते दु. ०५.३० |
| ०६ जानेवारी, २०२० (सोमवार) | तंत्रशिक्षण विभाग पदवी अभ्यासक्रम | तंत्रशिक्षण विभाग पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | फक्त २ महाविद्यालयीन प्रतिनिधी | फक्त २ महाविद्यालयीन प्रतिनिधी |
| ०७ जानेवारी, २०२० (मंगळवार) | उच्चशिक्षण विभाग पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम | कला/आयुष/वैद्यकीय/मत्स व दुग्ध आणि कृषी पदवी/पदव्युत्तर विभाग |
| | फक्त २ महाविद्यालयीन प्रतिनिधी | फक्त २ महाविद्यालयीन प्रतिनिधी |
| **स्थळ - सिडनॅम कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक, (डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह), बी-रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०** | | |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विभागनिहाय जिल्हयांतील महाविद्यालयांचे प्रतिनिधींनी सत्रानुसार निश्चित वेळेत उपस्थित रहावे. तसेच वेळापत्रकानुसार प्रत्येक महाविद्यालयाच्या प्रतिनिधींशी संवाद साधने शक्य होणार नाही, तेव्हा महाविद्यालय प्रतिनिधींनी त्यांना व विद्यार्थ्यांना उद्भवलेल्या अडचणी/शंका/ तक्रारी/सुचना सोबत जोडलेल्या अभिप्रायामध्ये (Feedback Form) भरुन आणाव्यात व कार्यक्रम स्थळावरील नोंदणी कक्षाकडे (Registration Desk) सादर कराव्यात, जेणेकरुन सीईटी कक्षास प्राप्त अभिप्रायांवर (Feedback) सविस्तर अभ्यास करुन समाधानकारक उपाय शोधता येईल.

संबंधित महाविद्यालयातील प्रतिनिधी सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी स्वतःच्या वाहनाने प्रवास करत असतील तर त्याठिकाणी वाहनतळ (Parking) सुविधा उपलब्ध नाही, याची नोंद घ्यावी. (वाहनतळ सुविधा रेल्वे स्थानक, बस स्थानक तसेच महानगरपालिकेची Pay and Parking सुविधा कार्यक्रम स्थळापासून नजीकच्या अंतरावर उपलब्ध आहे.)

**सही/-**
**(संदीप कदम)** भाप्रसे
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

सोबत - १) अभिप्राय (Feedback Form)
२) कार्यक्रम रुपरेषा